# पूर्वपरवानगीशिवाय कार्यालय सोडल्यास निलंबनाची कारवाई


## महसूलमंत्री चंद्रकांत बावनकुळेंच्या आदेशाने खळबळ



मुंबई (सरकार): सध्या सरकारी कार्यालयात एकच खळबळ उडाली आहे. पूर्व परवानगीशिवाय कार्यालय सोडणाऱ्या कर्मचारी, अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार लटकत आहे. पूर्व परवानगीशिवाय कार्यालय सोडल्यास कर्मचार्यांचे थेट निलंबन करण्यात येईल असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. मुख्यालयात अनुपस्थित राहणार्या अधिकार्यांना बावनकुळेंनी मोठा इशारा दिला आहे. जनसेवेत कसूर करणाऱ्या अधिकार्यांची गय करणार नाही. त्यांच्यावर निलंबनासह अन्य शिस्तभंगात्मक कारवाई करण्याची सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यात जनसेवेत कसूर करणाऱ्या अधिकार्यांची गय केली जाणार नाही असा सज्जड दम महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भरला आहे. महसूल अधिकार्यांनी वरिष्ठांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडल्यास निलंबन करण्यासह अन्य शिस्तभंगात्मक कारवाई करण्याच्या सूचना मंत्री बावनकुळेंनी दिल्या आहेत. महसूल विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांतील तहसीलदार ते निवडश्रेणीतील अप्पर जिल्हाधिकारी, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक तसेच जमाबंदी आयुक्त व संचालक (भूमी अभिलेख) यांच्या अधिनस्थ काही अधिकारी वारंवार विनापरवानगी मुख्यालयात गैरहजर राहत असल्याचे आढळून आले. यासंदर्भात मंत्री बावनकुळे यांच्याकडे आलेल्या तक्रारींची पडताळणीत केल्यावर तथ्य आढळून आल्याने तातडीने हे कारवाईचे आदेश दिले आहेत.

सरकारी काम आणि चार दिवस थांब असा सर्वसामान्यांचा अनुभव आहे. सामान्यांना साध्या कामासाठी पण वाट पाहावी लागत असल्याने त्यांनी तक्रारीचा पाढा वाचला होता. महसूल विभागाच्या महत्त्वाच्या बैठका किंवा आकस्मिक परिस्थितीत प्रशासनास अडचणींचा सामना करावा लागतो. अनेकदा जनता कामानिमित्त ताटकळत बसते, अशा स्थितीत काही अधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्याचे दिसून आले.



शासकीय सुट्ट्या किंवा शासकीय दौऱ्यावर अधिकारी व कर्मचारी असतील तर गैरहजरी मान्य करण्यात येईल. मात्र, इतर वेळी मुख्यालयात उपस्थित राहणे परिपत्रकातून बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. वरिष्ठांच्या अखत्यारीतील कोणताही अधिकारी पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडणार नाही. असे आढळून आल्यास वरिष्ठ अधिकार्यांना जबाबदार धरले जाईल. ही कारवाई शिस्त, कार्यक्षमता व लोकाभिमुख प्रशासन अबाधित ठेवण्यासाठी अत्यावश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे.


सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २१७ वा ■ गुरुवार २४ एप्रिल २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक २५ एप्रिल २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 217 ■ Thursday 24 April 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


# विद्यार्थीनीवर बलात्कार प्रकरणी शिक्षकास १४ वर्षे शिक्षा

अंबाजोगाई (सरकार): सन २०१९ मध्ये अंबाजोगाई येथील एका शाळेतील शिक्षकाने त्याच शाळेतील एका विद्यार्थ्यानीवर बलात्कार केल्याची घटना घडली होती.या प्रकरणाची अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी झाली.या प्रकरणात पिडीतेस १ लाख रू. नुकसान भरपाई देण्याचे न्यायालयाने आदेश दिले असुन आरोपीस १४ वर्षे सक्त मजुरी व १ लाख २ हजार रूपयाच्या दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

या प्रकरणील हकीकत अशी की, अंबाजोगाई येथील खोलेश्वर विद्यालयातील शिक्षक आरोपी शाम वारकड याने त्याच शाळेतील एका विद्यार्थीनीवर बलात्कार केला अशा प्रकारची घटना सन २०१९ मध्ये घडली होती. या प्रकरणात पिडीत मुलीच्या आईने फिर्याद देवुन तिच्या मुलीला क्रीडा शिक्षक आरोपी शाम वारकड याने जालना येथे स्पर्धेसाठी खेळावयास घेऊन जावुन अंबाजोगाईत आल्यानंतर तिच्यावर क्रीडा संकुल अंबाजोगाई येथे बलात्कार केला. या प्रकरणाची माहिती कोणास सांगितली तर तुला व तुइ-या आईवडीलांना जिवे मारून टाकुन अशा प्रकारची धमकी दिली. ही बाब पिडीत मुलीच्या शाळेतील वर्तुणुकीतून तिच्या शाळेतील एका शिक्षिकेस लक्षात आली. तसेच मानवलोक या सामाजिक संस्थेतर्फे शाळेमध्ये लहान विद्यार्थीनींना चांगला स्पर्श, वाईट स्पर्श या विषयावर चर्चासत्र आयोजीत करण्यात आले होते. त्यावेळी शाळेतील शिक्षीकेने पिडीत मुलीच्या वर्तुणुकीत झालेला बदलामुळे तिस तिच्या आईवडीलांना घरी घेवुन येण्यास सांगितले व पिडीत मुलीच्या शाळेतील वर्तणुकीत झालेला बदल तिच्या आईवडीलांना सांगितला. त्यावरून पिडीत मुलीच्या आईवडीलांनी तिच्याकडे चौकशी केली असता तिने आरोपीने तिच्यासोबत दि.१७-१०-२०१९ रोजी कुकर्म केल्याचे सांगितले.



त्यावरून पिडीत मुलीच्या आईने दि. १८-१२-२०१९ रोजी अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यास फिर्याद दिली. त्यावरून गुरनं ५४५/२०१९ कलम ३५४-अ, ३७६ (एफ) (आय) तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ४, ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करून तपास तत्कालीन उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल धस यांच्याकडे देण्यात आला. त्यावरून तपासअधिकारी यांनी तपास करून आरोपीविरूद्ध जिल्हा व सत्र न्यायालय अंबाजोगाई येथे दोषारोपपत्र दाखल केले.

या प्रकरणाचा साक्षीपुरावा चालु झाल्यानंतर सरकार पक्षाच्या वतीनें अँड.लक्ष्मण फड यांनी एकुण ११ साक्षीदार तपासले. त्यात पिडीत मुलगी व फिर्यादी तिची आई या दोघींची साक्ष अत्यंत महत्वाच्या ठरल्या. तर बचाव पक्षाच्या वतीने २ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीपुरावा संपल्यानंतर दोन्ही बाजुचा न्यायालयात युक्तीवाद पुर्ण केला. सरकारी पक्षाच्या वतीने ड. लक्ष्मण फड यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपीस ३५४-अ, ३७६ (२) (एफ) (आय) व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ४, ८, १२ प्रमाणे दोषी धरून आरोपीस १४ वर्षाची सक्त मजुरी व दंड ठोठावला. सरकार पक्षाच्या वतीने सरकारी वकील ड.लक्ष्मण फड यांनी काम पाहिले तर त्यांना पैरवी म्हणुन गोविंद कदम व बाबुराव सोडगीर यांनी सहकार्य केले.

# पहलगाम हल्ल्याचा दुखवटा म्हणून बीड येथील भीमगीतांचा कार्यक्रम रद्द

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले संयुक्त जयंती उत्सव समितीचा निर्णय

बीड (सरकार): भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक डॉ.अनिरूद्ध वनकर यांचा कार्यक्रम दि.२५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला होता. परंतु पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्लयात अनेक निष्पाप नागरिकांचा दुर्दैवी मृत्यु झालेला आहे. याचा दुखवटाम्हणून जयंती उत्सव समितीकडून भीमगीतांचा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून अखंडितपणे साजरी केली जाते. याहीवर्षी आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२५ एप्रिल २०२५ रोजी बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक डॉ.अनिरूध्द वनकर यांचा भीमगीतांचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. परंतु जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी भारतातील विविध भागांतून पर्यटनासाठी गेलेल्या नागरिकांवर भ्याड हल्ला केला. या हल्लयात अनेक निष्पाप लोकांचे जीव गेले. ही घटना अत्यंत दुःखद आहे. त्यामुळे बीड येथील भीमगीतांचा नियोजित कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले संयुक्त जयंती उत्सव समितीकडून घेण्यात आला आहे. याबाबत जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष ड.सिध्दार्थ शिंदे यांच्याकडून माहीती देण्यात आली आहे.

# संतोष देशमुख प्रकरणाची पुढील सुनावणी आता ७ मे रोजी होणार

बीड (सरकार): येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आज गुरुवारी (दि. २४) सुनावणी पार पडली. यात वाल्मिक कराडने दाखल केलेल्या डिस्चार्ज ॲप्लिकेशनवर सरकारी पक्षाने आपले म्हणणे दाखल केले. तर विष्णू चाटेच्या वकिलाकडून डिस्चार्ज ॲप्लिकेशन दाखल करण्यात आले आहे. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी ७ मे रोजी पार पडणार आहे. पुढील सुनावणीला विशेष सरकारी वकील उज्वल निकम उपस्थित राहणार आहेत. या सुनावणीत नेमकं काय होणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.


आज गुरुवारी (दि.२४) आरोपी वाल्मिक कराड याने दाखल केलेल्या डिस्चार्ज अर्जावर न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी सरकारी पक्षाने आपले म्हणणे कोर्टात मांडले,



तसेच मूळ फिर्यादीचे म्हणणे मागवले गेले आहे. मात्र, फिर्यादीकडून अजून म्हणणे सादर करण्यात आले नसल्यामुळे कोर्टाने पुढील तारीख दिली आहे. वाल्मिक कराडचे वकील ॲड. विकास खाडे यांनी सांगितले की, चार्ज फ्रेम होण्याची स्टेज अजून आलेली नाही. डिस्चार्ज अर्जावर सगळ्या पक्षांचे म्हणणे झाल्यावरच न्यायालय निर्णय देईल, आणि त्यानंतरच चार्ज निश्चितीची प्रक्रिया सुरू होईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

या प्रकरणाच्या दोषारोपपत्रातील सर्व कागदपत्रे आणि डिजिटल पुरावे अद्याप सर्व आरोपींना मिळालेली नाहीत. काही आरोपींचे जबाब सादर झाले असले तरी इतरांच्या जबाबांची अद्याप प्रतीक्षा आहे. त्यामुळे कोर्टाने आजची सुनावणी तहकूब केल्याचे माहिती देखील वाल्मिक कराडच्या वकिलांनी माध्यमांशी बोलतांना दिली आहे. तर आमचा प्रथमदर्शनी कुठेही सहभाग दिसून येत नाही. ही बाजू आम्ही मांडली होती. यावर दोषारोप पत्रामधील पुराव्याच्या आधारे सरकारी वकिलांनी आपले म्हणणे मांडले आहे. त्यामध्ये काय पुरावे गोळा केलेत किंवा काय म्हणणे सादर केले? हे युक्तिवादातून समोर येईल, असेही वकील खाडे यांनी म्हटले. दरम्यान, आरोपी विष्णू चाटे याच्या वतीने देखील डिस्चार्ज अर्ज दाखल करण्यात आला आहे. तसेच, त्याला बीड कारागृहात हलवावे या मागणीसंदर्भात आज सुनावणी झाली. यावर कारागृह अधीक्षक व सरकारी पक्षाने आपले म्हणणे कोर्टात सादर केले असून, न्यायालयाच्या निर्णयाची आता प्रतीक्षा आहे.

# परळीतील मोहिनी वाईन शॉप पोलिसांचा ‘जावई’ की कायद्या-पेक्षा मोठा?



## दारूबंदीचे आदेश धाब्यावर,पोलीस झोपले की मूग गिळून गप्प?

बीड (सरकार):परळी शहरात रात्री ११ वाजेपर्यंत सर्व दुकाने बंद करण्याचे स्पष्ट आदेश असताना, मोहिनी वाईन शॉप मात्र दररोज १२ वाजेपर्यंत खुले असते! कायद्याची ही थट्टा नागरिकांच्या मनात संताप उसळवणारी ठरत आहे. सर्वसामान्य दुकानदारांवर पोलिसांचा दबाव, दंडात्मक कारवाई केली जात असताना मोहिनी वाईन शॉपला ‘विशेष सवलत’ कशी? नागरिक विचारत आहेत, दारू विक्रेता पोलिसांचा जावई आहे का?

याहून धक्कादायक म्हणजे, या दुकानापासून अवघ्या १०० मीटर अंतरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा उत्सव सुरू असूनसुद्धा तिथे दारूबंदीचे कोणतेही पालन होत नाही. कायद्यानुसार असे कार्यक्रम असलेल्या परिसरात दारू विक्रीस सक्त मनाई असते. मात्र येथे दारू मुक्तपणे विकली जाते, आणि अधिकारी बघ्याची भूमिका घेतायत. शहरातील अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेत, तत्काळ चौकशी आणि कारवाईची मागणी केली आहे. पोलिस आणि प्रशासन जर अशा गंभीर प्रकरणात हात वर करत असतील, तर कायदा फक्त सामान्य जनतेसाठीच आहे का, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

# दुचाकी आडवी लावून भररस्त्यात लुटले

शिरूर कासार (सरकार): तालुक्यातील खालापुरी शिवारात तीन जणांनी दुचाकी आडवी लावत एकाला (दि.१८) शुक्रवार रोजी सायंकाळी सातच्या सुमारास लुटल्याची घटना घडली असून ६१,००० हजारांचा मुद्देमाल लंपास केल्याप्रकरणी शिरूर कासारपोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हाभरात लूटमार,चोरीच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. अर्जुन भाऊराव धांडे (वय ६५) रा.लिंबा हे दुचाकीवरून गावी जात असताना शिरूर कासार तालुक्यातील खालापुरी शिवारात तोंड ओळख असलेल्या (उीळाश)तीन जणांनी दुचाकीला धक्का देऊन खाली पाडत खिशातील रोख रक्कम व सोन्याची अंगठी असा एकूण ६१,००० हजारांचा मुद्देमाल लंपास लंपास केल्याची घटना (दि.१८) शुक्रवार रोजी सायंकाळी सातच्या सुमारास घडली असून अर्जुन धांडे यांच्या फिर्यादीवरून (दि.२३) बुधवार रोजी तीन जणांविरुद्ध शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस करत आहेत.



बीड : नवनियुक्त जिल्हाधिकारी श्री विवेक जॉन्सन सर यांचे महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने स्वागत

# बीडचे साक्षी कांबळे आत्महत्या प्रकरणातील तपास अधिकारी स्वप्नील राठोड बदलले

बीड (सरकार): बीडमधील साक्षी कांबळे या तरुणीने छेडछाडीला कंटाळून धाराशिवमध्ये मामाच्या घरी जाऊन गळफास लावून आत्महत्या केली. साक्षीच्या आईने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र देताच उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मंगळवारी बीडमध्ये येऊन कुटुंबाची भेट घेतली. त्यानंतर बुधवारी धाराशिवचे पोलिस उपअधीक्षक स्वप्नील राठोड यांच्याकडून तपास काढून घेत तो कळंबचे उपविभागीय अधिकारी संजय पवार यांच्याकडे दिला आहे. तसेच राठोड यांची चौकशी लावल्याचीही माहिती आहे.



साक्षी कांबळे (वय २०, रा. बीड) या मुलीने बीडमधीलच अभिषेक कदम याच्या त्रासाला कंटाळून १४ मार्च रोजी धाराशिव येथे मामाच्या घरी आत्महत्या केली. याच मुलीचा विवाह २० एप्रिल रोजी होणार होता. १९ एप्रिल रोजी आई कोयना विटकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भावनिक पत्र देऊन न्याय देण्याची मागणी केली होती. त्यानंतर मंगळवारी उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी कोयना यांची भेट घेतली. त्यानंतर डॉ. गोऱ्हे यांनी या प्रकरणात डीवायएसपी राठोड यांच्यावर कारवाई करण्याचे संकेत दिले होते. त्यानंतर बुधवारी लगेच राठोड यांच्याकडून तपास काढून घेण्यात आला. साक्षीची आई कोयना यांनी बुधवारी दुपारी बीडचे पोलिस अधीक्षक यांची भेट घेतली. बीडमधील इतर काही प्रकरणांचीही त्यांनी माहिती कोयना यांना दिली. या प्रकरणातील आरोपींसह यापूर्वी झालेल्या घटनांचीही चौकशी करावी, अशी मागणी कोयना यांनी एसपींकडे केली आहे. चौकशी करू, असे अश्वासन त्यांनी दिल्याचेही कोयना यांनी सांगितले.

## संपादकीय


# पहलगाममधील नरसंहार, हिंदू पर्यटकांना टार्गेट

भारताचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीरमधील पहलगाममध्ये मंगळवारी दहशवाद्यांनी निष्पाप पर्यटकांवर हल्ला करून २८ जणांची हत्या केली आणि त्या हल्ल्यात १६जण जखमी झाले. पहलगाममधील बैसरन घाटी म्हणजे दुसरे स्वित्झर्लंड म्हटले जाते. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलमांचे कवच काढून घेतल्यापासून भारत विरोधी शक्ती अशांत होत्या. काश्मिरी जनतेला देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोदी सरकार गेले दहा वर्षे जिद्दीने प्रयत्न करीत आहे. रोजगार, उद्योग व विकासाच्या माध्यमातून काश्मिरी जनतेचे जीवनमान उंचवण्यासाठी विविध क्षेत्रांत योजना राबवल्या जात आहेत. पाच वर्षांपूर्वी ३७०वे कलम रद्द केल्याच्या निर्णयावर संसदेने शिक्कामोर्तब केले. त्यानंतर गेल्या वर्षी लोकसभा व विधानसभा निवडणुकाही शांततेने पार पडल्या. दोन्ही निवडणुकीत काश्मिरी मतदारांनी मोठ्या प्रमाणावर मतदान करून देशातील संसदीय लोकशाही प्रक्रियेत आपला सहभाग आहे व देशाच्या लोकशाही पद्धतीवर आपला विश्वास आहे हे जगाला दाखवून दिले. विधानसभा निवडणुकीत लोकशाही मार्गानेच जनतेने ओमर अब्दुला यांच्या पक्षाला बहुमत दिले व ओमर अब्दुल्ला हे काश्मीरचे मुख्यमंत्री झाले. काश्मीरमध्ये जनजीवन वेगाने सुरळीत होऊ लागले. पर्यटकांच्या संख्येत मोठी वाढ झाली. काश्मीरची अर्थव्यवस्था ही पर्यटनावर अवलंबून आहे. बगीचे, हाऊस बोट, हॉटेल्स, सफरचंदाच्या बागा, गालिचे, निसर्ग सौदर्यांची तर काश्मीरला देणगी आहे. सध्या तर पर्यटकांचा हंगाम सुरू झाला आहे. देशातील सर्व भागांतून पर्यटकांचा ओघ काश्मीरकडे आहे. काश्मीरचे जनजीवन सुरळीत होत आहे, काश्मीरला पुन्हा आर्थिक सुबत्ता प्राप्त होत आहे हे ज्यांना बघवत नाही, अशा नतद्रष्ट प्रवृत्तींनी पहलगाममधे दहशतवादी हल्ला घडवला. काश्मीरच्या अर्थव्यवस्थेला खीळ बसावी, खोऱ्यात पुन्हा अशांतता निर्माण व्हावी, भारताविषयी काश्मिरी जनतेच्या मनात द्वेष आणि संताप आहे, असा संदेश जगभरात जावा, यासाठी दहशतवाद्यांनी पहलगाममधे नरसंहार घडवला.

पहलगाममधील दहशतवादी हल्ला हा निश्चितच पूर्वनियोजित कट होता. पर्यटकांना खिंडीत पकडून, ते बेसावध असताना व त्यांच्या आजूबाजूला सुरक्षा व्यवस्था नसताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. देशाच्या विविध भागांतून हजारो पर्यटक काश्मीर खोऱ्यात आनंद लुटायला गेलेले असताना हा दहशतवादी हल्ला झाला व त्या टोळीने मोठा रक्तपात घडवला. पर्यटकांमधे दहशत व भीती निर्माण व्हावी, त्यातून हिंदुस्थानातील पर्यटकांनी काश्मीरला फिरकू नये असे कारस्थान रचले गेले. मोदी सरकारच्या दुसऱ्या टर्ममधे पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतरचा हा पहलगामचा दुसरा मोठा दहशतवादी हल्ला आहे. पुलवामा येथे दहशतवाद्यांनी सुरक्षा दलाच्या वाहनांवर हल्ला करून ४० जवानांची हत्या केली होती, पहलगाम येथे २८ पर्यंटकांचे त्यांनी बळी घेतले. पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर निर्दयी दहशतवादी हल्ला झाला. पर्यटक नि:शस्त्र होते, तर दहशतवद्यांकडे एके ४७ सारख्या अत्याधुनिक बंदुका होत्या. पर्यटक कुटुंबीयांसह मौजमजा करायला आले होते, ते प्रतिकार करू शकणार नाहीत हे दहशतवाद्यांनी पूर्ण ओळखले होते. म्हणूनच तेथे असलेल्या ४० पर्यटकांपैकी २८ जणांवर समोरून गोळ्या घालून त्यांनी हत्या केली. गोळ्या झाडण्यापूर्वी दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांची नावे विचारली. ते हिंदू असल्याची खात्री करून घेतली व त्यांना जागीच ठार मारले. नावे सांगितल्यावर ज्यांच्याविषयी दहशतवाद्यांना संशय आला त्यांचे कपडे उतरवून, त्यांची शारीरिक तपासणी करून त्यांच्यावर बंदुका चालविल्या. काहींना तर कुराणातील कलाम पढायला दिले, ते वाचता आले नाही म्हणूनही ठार मारले. पर्यटक हिंदू आहेत हा एकच निकष या नरसंहारामागे होता. नवविवाहीत तरुणीच्या पतीला तिच्या समोरच दहशतवाद्यांनी ठार मारले, तेव्हा ती मलाही ठार मारा असे ओरडून सांगत होती, पण तिला त्यांनी मारले नाही, उलट जा, मोदींना जाऊन सांग, असे दरडावून बजावले. पर्यटकांना टिपून टिपून मारले हेच या हत्याकांडातून दिसून आले. १९९० च्या दशकात काश्मीर खोऱ्यात दहशतवाद जेव्हा शिगेला पोहोचला होता, तेव्हा हिंदूंना (पंडितांना) तेथे राहणे दहशतवाद्यांनी अशक्य केले होते. त्यांचे अपहरण, त्यांची हत्या, हिंदू महिलांवर बलात्कार, अत्याचार असे सर्वत्र प्रकार घडले. काश्मीर खोऱ्यात हिंदूंनी पुन्हा फिरकू नये, म्हणून दहशतवाद्यांनी पहलगाममधे हिंदूंचा नरसंहार घडवला असेल, तर भारत सरकारला दहशतवाद मोडून काढण्यासाठी कठोर पावले उचलावी लागतील.

एका बालाकोटच्या सर्जिकल स्ट्राईकनंतर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटना काहीशा नमल्या होत्या पण अजून त्या संपलेल्या नाहीत. सर्जिकल स्ट्राईकपेक्षा आणखी कठोर कारवाई करण्याची वेळ आली आहे. अमेरिकेचे उपाध्यक्ष भारताच्या दौऱ्यावर असताना दुसऱ्याच दिवशी पहलगाममधे नरसंहार झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियात असताना दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये रक्तपात घडवला. पाकिस्तानमधील लष्कर ए तोयबाशी संलग्न असलेल्या द रेझिस्टंट फ्रंट या संघटनेने पहलगाममधील हत्याकांडाची जबाबदारी घेतल्याचे जाहीर केले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे घटनेनंतर तत्काळ श्रीनगरला धावले व मृतांच्या नातेवाईकांची भेट घेतली, तेव्हा आम्हाला न्याय द्या, असा नातेवाईकांनी आक्रोश केला. पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून दिल्लीला परतले. नायब राज्यपाल मनोज सिन्हा व मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी हत्याकांडाचा तीव्र शब्दात धिक्कार केला आहे. पहलगाम हत्याकांडाच्या निषेधार्थ दुसऱ्याच दिवशी संपूर्ण काश्मीरमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. जगभरातील सर्वच प्रमुख नेत्यांनी दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आहेच, पण काश्मीरमधील जनतेने आपण भारताबरोबर आहोत असे ठामपणे म्हटले आहे. विशेष म्हणजे काश्मीरमधील इंग्रजी व उर्दू वृत्तपत्रांनी हत्याकांडाचा वृत्तांत देताना पहिले पान काळे प्रसिद्ध करून दहशतवादाचा निषेध केला आहे. पंतप्रधान मोदींनी दहशतवाद्यांना सोडणार नाही असे म्हटले आहेच. मोदी आपला शब्द खरा करून दाखवतील यावर भारतीय जनतेचा पूर्ण विश्वास आहे.

# मी स्वत:ला शोधताना



तुझ्या माझ्यातला 'मी'चा प्रवास म्हणजे सुख-दुःखातल्या वाटेवरचा विलक्षण ध्यास. वलयांकित अशा खाच-खळग्यातल्या या प्रवासात, जरी पडले, तरी उठून उभं राहण्याचा अगम्य, इच्छाशक्तीचा सहवास. आपल्या परीनं जगण्याला नवा अर्थ देणारा अहोरात्र वनवास. तुझं, माझं असणं म्हणजे स्वतःचा स्वत:नेचं घेतलेला अवघा शोध. मी स्वतःला शोधताना, अंती एकची उरते. भाववेड्या स्वप्नासंगे, राती एकली निजते. हे एकाकीपण असं रातीलाचं का बरं यावं? अशातचं या घनघोर, काळभोर रातीला जागं करून, बैचेन करण्याइतपतं या स्वप्नांना चैन पडत नसावं. म्हणूनचं मनावर स्वार होत ही स्वप्न रात्रीला त्यायोगे माझ्यातल्या 'मी'ला हैराण करतात. मग 'मी' अशी चाचपडत उठते. हे सत्य की स्वप्न, कळेस्तोवर उजाडलेलं असतं भकास. नदीच्या प्रवाहाला धार लागते. पाणी अधिक खळखळतं.

शीतल झुळकीवर स्वार होत वारा झाडांशी सलगी करतो. सोळावं वरीस असल्याच्या आवेगानं हसरा पारीजात मृत्तिका रंगात सरमिसळून घोळवून घेतो स्वत:ला. दूरवर पक्षांचा किलबिलाट, मोराचा केकारव, कोकिळेची कुहूकुहू बोली सर्वार्थानं अंगावर रोमांच उभं करायला आणि काय काय हवं असत? निसर्गाच्या सानिध्यात रमणाऱ्या देहाला उण्याची दुनिया सतावत नसली, तरी रात्रीच्या एकांतातलं बेभरवशासारखं जगणं, क्लेषदायक असतं. काळोख्या रात्री झोपेला चाळवून स्वत:ला हवी तशी फुलविण्याची आस धरणारी स्वप्न जागी करतात. महत्त्वाकांक्षा राक्षसी असू शकतात एखादवेळी; पण स्वप्न राक्षसी नसतात. स्वप्न खरी-खुरी, शांत-अल्लड, वेल्हाळ-खोडकर असतात.

भाकरीसोबत स्वप्नं या दोन गोष्टींची परीपूर्तता यावर अवलंबून असलेली माणसं आहोत आपण. तेव्हा मनासारखं घडलं की, स्वप्नील दुनियेत भटकंती करतो स्वच्छंदपणे. हा अनुभव वारंवार घेत असताना, मऊशार जांबूनी, गुलाबी रजईतला झोपेचा अंमल डोळ्यावर असतो. मनाच्या नकळत उसवलेला धागा सलतो कुठ तरी. मी लगबगीनं उठते, पाण्याचा भपकारा मारते तोंडावर. तांबडं फुटावयास अवधी असतो एव्हाना. रीतसर जुन्या-नव्या गाण्यांचा अल्बम काढते. पसाभर भिजलेला मनातला पाऊस गपगार असतो. सरींवर सरी कोसळत असतात अंगणात. सूर छेदणाऱ्या रागीणी आशा, लता बेसूर वाटू लागतात. थोडं वेगळं म्हणून सुरेशजींचे गाणं आठवतं. सूर भिडताचं रममाण होते मी. पाहिले न मी तुला तू मला न पाहिले, ना कळे कधी कुठे मन वेडे गुंतले. मनाचिया गुंती वाहत जाते. या अवस्थेपर्यंत कोलमडलेलं मन, भंगलेली स्वप्नं यांचा मेळ साधताना, शोधते मी मला स्वत:ला. यावेळचे प्रश्न सुटणारे नसतात. अधिक जटिल होत जाणारे असतात. हा प्रवास कुठे संपणार कुणास ठाऊक? तरीही नशिबाला दोष न देता, आनंदाने स्वीकारते त्याला. कुठल्या मक्तेदारीला बळी पडण्याइतपत दुबळी नाहीय मी. स्त्री मन हळवं असलं, तरी लढण्याचं सामर्थ्य अंगी असतचं तिच्या.

तुम्हालाही माझ्याप्रमाणं कोणे एके काळी प्रेमाच्या अत्युच्च शिखरानं मोहवलं असेलच की! असं काय होत त्याच्यात; जे आवडलं होत मला. आज माझं मलाचं हसू येत. निर्लेप मनाच्या गाभाऱ्यातलं प्रेम जे कधी फुललं नाही. बहरलं नाही. प्रेमाच्या पल्याड दिसू लागल्यावर, प्रेमाशी संबंधित कैक विषयाला फाटे फुटावेत, तसे फुटले फाटे निवडुंगासम. कडेलोट झाला प्रेमात. शेवट शून्याशी आला. पडले एकटी जेव्हा तेव्हा होती शिदोरी अनुभवांची. मग काय सज्ज झाले, लढायला सगळ्या सामर्थ्यानिशी. दिस नकळत जाई, गीत गात असे कोणी. वरपांगी दुःख माझे, आळवते ग् विराणी. मनावर लिंपण चढले. मी स्वतःला शोधताना, पाण्यात रंगले. रामनामे श्रीहरींच्या, भाव दर्शनात दंगले. एकदा का स्वतःला ओळखण्यात तुम्ही पारंगत झालात की, या 'मी'चं अस्तित्व खुलतं. त्यावेळी द्वैत-अद्वैताच्या भेटी पारलौकिक ठरत नाहीत. लौकिकत्व मिळविलेला चैतन्यरूपी आरसा तो. इथं तर मी आहे सर्वस्व. माझे मजला आहे भान.एकतारी धून वाजे, मीरा गाई कृष्ण गान. मीरा ही मीचं आहे. आयुष्याला सामोरं जाताना आलेल भान ही मीचं आहे. संकट धडे देतात आणि त्यातून उलगडते रहस्यमय जीवनसार. वीण घट्ट होते. सिद्धता येते. आत्मभान ते स्वयंसिद्धा हा खडतर प्रवास खऱ्या अर्थानं जगताना, आपणचं आपल्याशी केलेला वैचारिक, मानसिक करार जो विशिष्ट इप्सित साध्य करतो. त्यातून जी उभी राहते, ती रणरागिणी होय. आता योग्य दिशेनं पावलं चालू लागतात. हरी सावळ्याच्या दर्शनाला धावतात. कधी गरीबाचे हात होतात. कधी संत वचनाला जागतात. तर कधी कृपावंत दाता होतात. या सगळ्यात तावून सुलाखून माझं, मी पण घडलेलं असतं. रातराणी अबोल मी, कळीचा मोगरा मी. आसमंती भरुनी उरावे, निशिगंधित परिमळ मी. रोज पहावे त्यात मजला आरशाहून सुंदर मी.गुंतूनी गुंत्यात माझ्या, सोडवावे प्रश्न मी. असेन मी नसेन मी, परी जगा कळेन मी. मागे स्वकर्तृत्वाच्या पाऊलखुणा ठेवेन मी. ध्येय गवसतं, हाती उरतं अंतिम सत्य. जे चेहऱ्यात स्थिरावतं, माधुर्यात सामावतं. त्याहूनही मनाचा मोठेपणा, हृदयाची सर्जनशीलता यानं देहरूपी भांड भरून ओसंडून वाहतं. त्याचं क्षणी माझी मी स्वतंत्र होते, उडते, पंख पसरवते, भरारी घेते अवकाशात. हेच ते ठिकाण, जिथं आशावादी वळणवाट गवसलीय माझी मजला. इथं माझ्यातल्या मी तत्त्वाचा शोध संपलेला असतो. मी निर्भया शांत चित्ताने मार्गस्थ होते, अंतिम ध्येय गाठण्यासाठी. अंतिम ध्येय गाठण्यासाठी

# योगासनांमुळे केस लवकर वाढतात



तुम्हाला लांब, जाड आणि सुंदर केस हवे आहेत का? पण केसांची वाढ थांबली आहे असे तुम्हाला वाटत असेल तर काळजी करण्याची गरज नाही. आमच्याकडे काही योगासने आहेत ज्याने केसांची वाढ जलद होण्यास मदत होऊ शकते याची यादी आहे. हे साधे योग केसांचे आरोग्य सुधारतात आणि वाढीला गती देण्यासाठी त्यांना मजबूत करतात. एवढेच नाही तर या योगासनांच्या मदतीने टाळूचे पोषण होते आणि केस गळणेही कमी होते.

**माउंटन पोझ :** हातपायात बळ असू द्या. नितंब वर करा. गुडघे आणि कोपर सरळ करा. उलट 'त' आकारात या. तळवे वर दाब द्या.आता टाच मजल्यापासून वर करा. या स्थितीत ८ ते १० मोजपर्यंत श्वास रोखा.

**अर्ध पिंच मयूरासन :** सर्व प्रथम चटईवर उभे रहा. आता हात खाली घ्या. गुडघे अगदी सरळ ठेवा. त्यानंतर हात आणि कोपर जमिनीवर ठेवा.

शरीराला 'त' आकारात आणा. काही सेकंद या पोझमध्ये रहा. आता जुन्या स्थितीत परत येण्यासाठी तुमचे हात वरच्या दिशेने हलवा.

**शशांकसन :** व्रजासनात बसा. दोन्ही हात दोन्ही गुडघ्यांवर सरळ ठेवा. आता श्वास आत घ्या आणि दोन्ही हात वर करून सरळ करा. मान आणि पाठीचा कणा सरळ ठेवा. श्वास सोडताना हळू हळू खाली वाकणे. दोन्ही हात खाली आणा. नाक आणि कपाळ जमिनीवर ठेवा. दोन्ही हात जमिनीवर सरळ ठेवा. मग जुन्या मुद्रेकडे परत या.

**ब्रिज पोज :** हे करण्यासाठी, आपल्या पाठीवर झोपा. पाय वाकवा. हे करत असताना पायाचे घोटे आणि गुडघे सरळ रेषेत असावेत. श्वास आतल्या दिशेने घ्या आणि हळू हळू पाठ आणि नितंब वर करण्याचा प्रयत्न करा. पण, तुम्हाला मान, खांदे आणि डोके जमिनीवरून उचलण्याची गरज नाही.

काही वेळ या पोझमध्ये रहा. आता श्वास सोडताना हळूहळू पहिल्या स्थितीकडे परत या.

**केसांच्या वाढीसाठी या गोष्टी लक्षात ठेवा :** फळे, हिरव्या भाज्या, ज्यूस आणि प्रथिनेयुक्त गोष्टींचा आहारात समावेश करा. पुरेसे पाणी प्या.

व्हिटॅमिन-डीसाठी सकाळच्या उन्हात काही वेळ बसा. दररोज ८ तास झोप घ्या.जंक फूड आणि तळलेले पदार्थ टाळा.

# बंद पाकीटातील पदार्थ खाण्यापूर्वी...

**मुंबई (सरकार):** बाजारातून जेव्हा तुम्ही पाकिटातील काही गोष्टी जसे औषधे, बिस्कीट, दूध, दही अथवा ब्युटी उत्पादने घेता तेव्हा त्याच्यावर एक्सपायरी डेट लिहिलेली असते. तर काही पाकिटांवर बेस्ट बिफोर लिहिलेले असते. मात्र तुम्हाला माहीत आहे का या दोन गोष्टींमध्ये काय फरक आहे.

खरंतर अनेकांना एक्सपायरी डेटबद्दल माहीत आहे. मात्र बेस्ट बिफोर आणि यूज बाय डेटबद्दल साऱ्यांनाच माहिती नसते. अनेकजण या दोन गोष्टींचा अर्थही एक्सपायरी डेटसारखाच समजतात. मात्र असे नाही आहे. प्रत्येक गोष्टीचा अर्थ वेगवेगळा आहे.**एक्सपायरी डेट म्हणजे काय ?**एक्सपायरी डेट याचा अर्थ एखाद्या उत्पादनाची ती तारीख ज्यानंतर तिचा वापर केला जाऊ शकत नाही. जर खाण्याच्या गोष्टीवर २० जून अशी एक्सपायरी लिहिली असेल तर २० जूननंतर तुम्ही ते खाऊ शकत नाही. एक्सपायरी डेटनंतर जर तुम्ही ते वापरत आहात तर आरोग्यास नुकसान पोहोचू शकते. एक्सपायरी डेटनंतर तर औषधे चुकूनही वापरू नयेत. बेस्ट बिफोर आणि यूज बाय हे अधिकतर खाण्याच्या गोष्टींवर लिहिलेले असते. बेस्ट बिफोर एखाद्या गोष्टीचे क्वालिटी इंडिकेटर असते. म्हणजेच जर तुम्ही एखादी गोष्ट बेस्ट बिफोर डेटनंतर खात आहात तर त्यात तुम्हाला स्वाद आणि पोषकतत्वे मिळणार नाही. तसेच यूज बाय डेट. हे त्या गोष्टींवर लिहिलेले असते जे काही दिवसांत खराब होतात. जसे, दूध, दही, ब्रेडच्या पाकिटांवर यूज बाय डेट पाहायला मिळते. जर एखादे उत्पादन आज बनले आहे तर ते पुढील ४ दिवसापर्यंत वापरता येऊ शकते यासाठी यूज बायचा वापर करतात.

# भाजलेल्या पेरूमध्ये लपलेला आहे आरोग्याचा खजिना



**पेरू भाजून खाण्याचे फायदे-** एलर्जी होणार नाही- एलर्जी मध्ये पेरू भाजून खाल्यास अनेक फायदे मिळतात. अनेक लोकांना एलर्जीची समस्या असते. ज्यामध्ये हिस्टमाइन वाढून जाते. अशावेळेस पेरू भाजून खाल्यास या समस्येपासून अराम मिळतो.

**कफापासून अराम-** कफ आणि कंजेशनमध्ये पेरू भाजून खायला हवा, तसेच भाजलेला पेरू खाल्यास कफ पातळ होण्यास मदत होते. याशिवाय ज्या लोकांना एसनोफिल्स वाढून जाते त्यांच्यासाठी पेरू खाणे फायदेशीर असते. ही समस्या कमी होण्यास मदत मिळते.

**ब्लोटिंग मध्ये फायदेमंद-** ब्लोटिंग की समस्या, महिलांना आणि सर्वात जास्त त्रस्त करते अश्यावेळेस पेरू भाजून खाल्यास पोटाला अनेक फायदे मिळतात. यामधून निघणारा अर्क पोटातील एसिडिक पीएचला कमी करते. ज्यामुळे ब्लोटिंगची समस्या कमी होते. सोबतच मुलांचे पोट फुगणे कमी होते.

**सर्दी-जुकाम पासून रक्षण-** पेरू भाजून खाल्याने सर्दी-जुकामची समस्या दूर होते. तसेच आयुर्वेदात मानले जाते की पेरू भाजून खाल्याने शरीरामध्ये संक्रामक आजार होत नाही. बदलत्या वातावरणात आजारांपासून दूर राहण्यासाठी पेरू भाजून खावा.

# कवठ खाण्याचे फायदे

मसालेदार चटणी अधिक उत्कृष्ट बनवणारे हे आंबट फळ आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. चला कवठाच्या काही फायद्यांविषयी जाणून घ्या

कवीठ फळात कार्बोहायड्रेट आणि प्रोटीन नावाचे भरपूर पोषक असतात . हे बीटा कॅरोटीन, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन सी, थायमिन आणि राइबोफ्लेविन देखील समृद्ध आहे. विविध पौष्टिक पदार्थांनी समृद्ध झाल्यामुळे पोटात कवीठ खूप फायदेशीर आहे.हे व्हिटॅमिन सी चे समृद्ध स्रोत आहे आणि व्हिटॅमिन सी ची कमतरता दूर करते.



*** पचन चांगले राहते-**चांगली पचनक्षमता ठेवतो , शरीराचे तापमान तसेच कोलेस्ट्रॉल आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतो .शरीराला थंडावा देतो. तहान शमवून रक्तविकारापासून मुक्त करतो,बद्धकोष्ठतेचा त्रास नाहीसा करतो. पोटाचे जंत नाहीसे करतो.

*** रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करत -**झाडाच्या खोड व फांद्यांमध्ये फेरोनि नावाचा डिंक असतो. रक्तातील साखरेचा प्रवाह, स्राव आणि संतुलन व्यवस्थापित करण्यास मदत करतो.हे डिंक इन्सुलिन आणि रक्तातील साखरेची पातळी वाढण्यास रोखतो.

*** डोकं दुखी कमी करतो-** हृदय रोग आणि डोकेदुखीसाठी कवीठचे फळ फायदेशीर आहे. याचा सेवन केल्याने डोके दुखीचया समस्येपासून मुक्त होतो आणि यामुळे हृदयाचे आरोग्यही राखण्यास मदत करतो.
.

*** ऊर्जेची पातळी वाढवतो-** या मध्ये जास्त प्रमाणात प्रथिने आढळतात ज्यामुळे ते शरीरास ऊर्जा प्रदान करण्यात मदत करते. याचा उपयोग शरीरात उर्जा टिकवून ठेवण्यासाठी केला जातो. कोणत्याही स्वरूपात याचे सेवन करणे फायदेशीर आहे.

# सुदृढ आरोग्यासाठी लहान मुलांना चांदीच्या भांड्यामध्ये खाऊ घाला

आपल्या हिंदू धर्मात चांदीला अतिशय शुभ आणि पवित्र मानले आहे.आधीच्या काळात लोक चांदीच्या ताटात किंवा केळीच्या पानावर जेवण करत असे.त्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले असायचे.चांदीच्या पात्रात जेवण केल्याने शारीरिक आणि मानसिक व्याधी दूर होतात. स्त्रियांचे अनेक व्याधी दूर करण्याचे कार्य चांदी करते.चांदी मुळात थंड प्रकृतीची असते.म्हणूनच चांदीचे वैशिष्ट्य दागिने भारतीय स्त्रिया घालतात.पूजेत देखील चांदीच्या पात्रांचा महत्त्व आहे आणि ते उपयोग केले जातात.

बाळाच्या जन्माच्या ६ महिन्यानंतर त्याला चांदीच्या ताटात जेवू घातले जाते. चांदीच्या ग्लासाने पाणी पाजलं जाते. मामाच्या हातून बाळाचं उष्टावण केलं जातं.या नंतर बाळ ठोस आहार घेऊ शकतात असे म्हटले जाते.पण या मागील काही शास्त्रीय कारण आहे.तसं तर चांदीच्या ताटात किंवा पात्रात प्रत्येकानेच जेवायला हवे.लहान मुलांना दिल्यास त्यांचा शारीरिक,मानसिक विकास चांगला होतो.बाळाला अनेक व्याधी आणि आजारांपासून संरक्षण करता येते. बाळास चांदीत जेवू घातल्याने किंवा पाणी पाजल्याने पोटदुखी,डायरिया,पोटाचे इतर आजारानं पासून रक्षण होते.लहान मुलांची स्मरणशक्ती वाढते,आणि अन्य संसर्गा पासून रक्षण होते.आपण चांदीचा वापर करण्याचे फायदे बघू या...

**१ संसर्गापासून बचाव :**

चांदी शुद्ध धातू आहे.ह्यात समाविष्ट अँटी मायक्रोब्रियल शरीरास रोगांपासून रक्षण करते.यामुळे शरीरात कुठलेही संक्रमण होत नाही.

**२ शरीरास थंड ठेवते:**

चांदी थंड धातू असल्याने बाळाच्या आरोग्यास चांगली असते.शरीरातील उष्णतेला कमी करते.त्यामुळे बाळ शांत राहतं,उग्र किंवा तामसी होत नाही.उन्हाळ्यात चांदीचा ताटात जेवू घालावे,आणि चांदीचा ग्लासा मधून पाणी किंवा दूध पाजावे.

**३ शरीरातील रोग प्रतिरोधक शक्ती वाढीस होते :**

लहान मुलं नाजूक असतात त्यामुळे त्यांची शरीरातील रोग प्रतिरोधक शक्ती कमकुवत असते.ते लवकर आजारी पडतात.चांदीचा वापर केल्याने या धातूचे काही अंश जेवणातून शरीरात जातात आणि त्यामुळे मुलांची रोग प्रतिरोधक शक्ती सुदृढ होते आणि मुलं निरोगी राहतात.

**४ वात- कफाचा त्रास कमी होतो:**

सततच्या पित्त दोषांच्या त्रासामुळे लहान मुलांना नेहमीच सर्दी पाडसाच्या त्रास होतो.चांदी वापरल्याने मुलांना या त्रासांपासून मुक्ती मिळते.

**५ स्मरणशक्तीत वाढ होणे :**

जेवणातून चांदीचे कण पोटात गेल्याने मुलांच्या स्मरणशक्तीस वाढण्यास मदत होते आणि ते निरोगी व सुदृढ बनतात. चांदीच्या



पात्रात कोणत्याही वयोगटाच्या लोकांनी जेवणे किंवा पाणी पिणे लाभदायक असते. याने शरीरास तेज येते. हे शरीराचे आरोग्यास लाभप्रद असते.

## विशेष वृत्त

### लवाद अधिकारीपदी अ‍ॅड. सारडा यांची निवड

**बीड (प्रतिनिधी):** येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील विधीज्ञ अ‍ॅड. बालासाहेब सारडा यांची सहकार आयुक्त कार्यालय पुणे यांनी २०२५-२८ या वर्षासाठी दुसऱ्या वेळेस लवाद अधिकारी म्हणून निवड केली आहे.

अ‍ॅड. बालाप्रसाद द्वारकादास सारडा हे मागील १४ वर्षांपासून बीड जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये वकीली व्यवसाया करीत आहेत. यापुर्वी त्यांना अवसायक व लवाद अधिकारीचे पॅनलवर नियुक्ती मिळालेली आहे त्यानंतर त्यांची दुसऱ्यांदा सहकार आयुक्त पुणे यांनी लवाद नामतालिकेत लवाद अधिकारी म्हणून निवड केलेली आहे. तसेच त्यांची केंद्र सरकारमार्फत जाहिर केलेल्या नोटरीच्या यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट केलेले आहे.

### मोरेवाडीत सुपर मार्केटमध्ये चोरी

**अंबाजोगाई:** मोरेवाडी येथील यशवंतराव चव्हाण चौका शेजारी असलेल्या सत्यम सुपर मार्केट दुकानात नगदी रक्कम व किराणा माल असे ५० हजार रुपयांची चोरी झाल्याची घटना मंगळवारी (दि. २२) सकाळी सात वाजण्याच्या सुमारास दुकान उघडतांना उघडकीस आली. शहरातील प्रशांत नगर येथे राहणारे जयंत चौधरी यांचे मोरेवाडी येथील यशवंतराव चव्हाण चौकाच्या शेजारी सत्यम सुपर मार्केटचे दुकान आहे. या दुकानातील गोडाऊनचे सिलिंग पत्राचे नट बोल्ट काढून पत्रा वर करून दुकानात चोरट्यांनी प्रवेश केला. यावेळी चोरट्यांनी नगदी ५ हजार रुपये व ४५ हजार रुपयांचे किराणा साहित्य व असा ५० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी जयंत चौधरी यांच्या फिर्यादीतून अज्ञाताविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

### उष्माघातामुळे तरुणाचा मृत्यू

**परळी (प्रतिनिधी):** शहर आणि परिसरात उन्हाचा पारा ४२ अंशपेक्षा अधिक पुढे सरकला आहे. अतिशय तप्त उन्हात अनेक कष्टकरी कामगार काम करतच असतात पण हे कष्टही काही वेळेस जीवावर बेततात. परळी शहरातील मोंढा मार्केटमध्ये भर उन्हात हमालीचे काम करताना अचानक चक्कर आल्यामुळे खाली कोसळला त्यांचा जागेवर त्याचा मृत्यू झाला.

शहरापासून जवळच असलेल्या चांदापूर येथील युवक नाव सचिन बळीराम काळे (वय ३५) हा मोंढा बाजारात हमालीचे काम करत होता. मंगळवारी सकाळी तो शहरात कामासही आला, काही काळ त्याने कामही केले. मात्र दुपारच्या वेळी काम चालू असतानाच त्याला चक्कर आली आणि तो खाली कोसळला काही वेळातच तो जागेवरच गतप्राण झाल्याची दुर्दैवी अशी घटना घडली आहे. परळी शहर आणि परिसरात उन्हाचा पारा ४२ अंशापेक्षा अधिक असून प्रचंड तप्त ऊन आहे. तप्त उन्हामुळेच सचिन चा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### श्रावणबाळ व संजयगांधी योजनेतील लाभार्थ्यांचे अर्ज मंजुर करा

**माजलगाव :** तालुक्यातील श्रावणबाळ व संजयगांधी योजनेतील गरीब, गरजु लाभार्थ्यांचे अर्ज सात महिणे होउनही मंजुर करण्यात आले नसुन सदरील अर्ज मंजुर करा अन्यथा उपोषण करण्याचा इशारा तहसिलदाराना अपेक्षित समाज संघटनेच्या वतीने दि. २१ सोमवारी दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, श्रावणबाळ व संजय गांधी योजनेचे शेकडो अर्ज तहसिल कार्यालयात सात महिण्यांपासुन धुळखात पडुन असुन प्रलंबीत आहेत. तहसिल प्रशासनाने अद्यापही या लाभार्थ्यांचे अर्ज मंजुरी परिणामी लाभार्थ्यांना मंजुरीची प्रतिक्षा करावी लागत आहे. त्यामुळे तहसिल प्रशासनाने विनाविलंब प्रलंबीत अर्ज मंजुर करून मंजुरी पत्र तहसिल कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा उपेक्षित समाज संघटनेचे कार्याध्यक्ष अशोक दादाराव नाडे यांनी निवेदनाव्दारे दिला आहे.

### 'वसुंधरा सरंक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी'

**गेवराई :** तालुक्यातील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर, गढी येथे भूगोल विभागाच्या वतीने जागतिक वसुंधरा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्राचार्य प्रोफे. डॉ. सदाशिव सरकटे, गृहशास्त्र विभाग प्रमुख प्रोफे. डॉ. राणी जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. राणी जाधव यांनी वसुंधरा दिन साजरा करण्यामागील भूमिका विशद केली प्राचार्य डॉ. सरकटे यांनी म्हणाले, सध्या पृथ्वीचे तापमान खूप झपाट्याने वाढत आहे. अनेक जीवसृष्टी व वनस्पती नष्ट होत आहेत. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. पृथ्वी, एकमेव जीवनदायी ग्रह, आज असंख्य पर्यावरणीय समस्यांशी झुंजत आहे– जसे की हवामान बदल, जंगलतोड, प्रदूषण, जैवविविधतेचे गढी महाविद्यालयात जागतिक वसुंधरा दिन उत्साहात नुकसान आणि संसाधनांचा अतिरेकी वापर. या वर्षीची थीम आपली शक्ती, आपला ग्रह केवळ ऊर्जा क्षेत्राबद्दल बोलत नाही तर ती हे दशीते की सामूहिक प्रयत्नांद्वारे आपण या संकटावर उपाय शोधू शकतो. हवा, पाणी आणि जमीन प्रदूषणाचा मानवी आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. जागतिक वसुंधरा दिन हा फक्त एक दिवस नाही तो एक इशारा, प्रेरणा आणि एक चळवळ आहे. हे आपल्याला आठवण करून देते की पृथ्वी ही आपली जबाबदारी आहे. जर आपण आज आपले वर्तन, धोरणे आणि जीवनशैली बदलली नाही तर भविष्यातील पिढ्यांना राहण्यासाठी सुरक्षित आणि सुंदर पृथ्वी मिळू शकणार नाही. पृथ्वी वाचवणे हे कोणत्याही एका व्यक्तीचे किंवा कोणत्याही एका राष्ट्राचे काम नाही ती आपल्या सर्वांची संयुक्त जबाबदारी आहे. प्रास्ताविक प्रा.डॉ. शिवलाल घुगे तर सूत्रसंचालन भूगोल प्रा.डॉ. कलंदर पठाण यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

### विजेच्या लंपडावाने पिंपळनेरकर त्रस्त; आंदोलनाचा इशारा

**बीड (प्रतिनिधी):** तालुक्यातील पिंपळनेर परिसरातील वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर २४ तास वीज अनिवार्य असली तरीही परिसरातील वीज वारंवार खंडित होत आहे. त्याचा त्रास नागरिकांना होत आहे. येथील वीजपुरवठा सुरळीत करा अन्यथा लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा पिंपळनेर विकास कृती समितीने दिला आहे. गेल्या आठवड्यांपासून, पिंपळनेर, काही ईंट, जवळा, नाथापूर, गुंदावडगांव, ढोरवाडी, सांडरवन आदी परिसरात सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. सध्या परिसरातील कमाल तापमान ४१ अंशांपर्यंत असल्याने एसी, फॅन, कुलरचा वापर करणे अनिवार्य झाले आहे. परंतु, सतत होर्णाया खंडित वीजपुरवठ्यामुळे नागरिक विशेषतः लहान बालके, वयोवृद्ध व विद्यार्थी हैराण झाले विजेच्या कमी जास्त आहेत. दाबामुळे टीव्ही, फिज, एसी, कुलर, मिक्सर, गिझर यांसारख्या वस्तू खराब होण्याचे प्रकार घडत आहेत. वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास पिंपळनेर येथील महावितरण कंपनीच्या कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचा इशारा पिंपळनेर विकासकृती समितीचे प्रमुख शिरसाट शिवप्रसाद यांनी दिला आहे.

# तीस वर्षांपूर्वी दुरावलेली पाखरे जमली नाथांच्या उद्यानात!

## एकनाथ महाराजांच्या जीवनातील आदर्श घेऊन पुढील आयुष्य जगा: योगेश महाराज गोसावी



**शिरूर (प्रतिनिधी):** शाळा व महाविद्यालयीन जीवनामध्ये विद्यार्थी म्हणून आयुष्याला आकार देण्यासाठी एकवटलेले निरागस जीव आयुष्याच्या पुढील लढाईमध्ये वेगवेगळ्या मार्गाने विभक्त होत असतातएक दोघांच्या भेटी सोडल्या तर एकत्र शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा भेटणे अशक्य असते. परंतु गेट-टुगेदरच्या माध्यमातून सध्या एकत्र येण्याची पद्धत रूढ होताना दिसून येत आहे. १९९५ मध्ये कालिकादेवी महाविद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांनी शांतिब्रह्म एकनाथ महाराज यांच्या पैठण नगरीमध्ये सामाजिक कार्यकर्ते आजिनाथ गवळी यांच्या पुढाकारातून हा सोहळा संपन्न झाला. कालिकादेवी माध्य. व उच्च माध्य. विद्यालयात १९९५ साली इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेणारी बॅच पुढील शिक्षणासाठी वेगवेगळ्या ठिकाणी स्थलांतरित झाली यानंतर या बॅचमधील विद्यार्थ्यांच्या पुन्हा एकत्र भेटी नसल्याने दि.१९ रोजी शांतीब्रह्म एकनाथ महाराज

यांच्या पैठण नगरीमध्ये गेट-टुगेदरचे आयोजन करण्यात आले. यावेळी शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज यांचे वंशज योगेश महाराज गोसावी यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांना शांती ब्रह्म एकनाथ महाराज यांच्या जीवनातील आदर्श घेऊन

पुढील आयुष्यात शांततेच्या व स्थैर्याच्या मार्गाने जीवन जगावे यासोबतच एकनाथ महाराजांचे आशीर्वाद कायम तुमच्या पाठीशी राहतील असे सांगत योगेश महाराज गोसावी यांनी शुभेच्छा दिल्या. सर्व विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देऊन प्रत्येकाच्या सुखदुःखाच्या गोष्टी यावेळी वाटून घेतल्या. यावेळी इंजि. संतोष गर्जे यांचेसह अशोक खोले, प्रकाश काशिद, डिगांबर तावरे, हनुमान काकडे, बबन सप्रे, आजिनाथ मैंदड, नवनाथ वीर, लहू व्हरकटे, शिवाजी व्हरकटे, रामनाथ जाधव, जयश्री वाघमारे, मनिषा चव्हाण, हारीभाऊ कवादे, सविता ऊटे, आण्णासाहेब वाघुंब्रे, सुलभा खोले, रामनाथ बडे, नवनाथ पानखडे, मंदा खोले, अमिना शेख, सविता गिरी, बद्रीनाथ पवार, कल्याण पाखरे, गोरक्ष कांबळे, अर्जुन भोसले, लक्ष्मी चांदणे, संगिता लाटे, सर्जेराव खोले, कचरू कातखडे, कल्पना भुजबळ, गणेश कवादे, पंडीत तांबे, चंद्रकला तळेकर आदी उपस्थित होते.

### राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत रौप्यपदक

**माजलगाव (प्रतिनिधी):** छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय खुल्या कराटे स्पर्धेत माजलगाव येथील हितांशी रितेश मुगदिया (वय ६ वर्ष) हिने सुवर्ण पदक तर रिदम रितेश मुगदिया (वय १० वर्ष) हिने रौप्य पदक पटकाविले. ही स्पर्धा दि.१८एप्रिल रोजी छत्रपती संभाजीनगर येथे केली होती. या दोघींबरोबर याच अकॅडमीच्या १२ खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत एकूण १२ पदकांची लयलूट केली. अकॅडमीचे सुवर्ण पदक विजेते खेळाडू हितांशी मुगदिया, अन्वी सारडा, रेणू पंडित, संध्या कुटे, जान्हवी होके, आदर्श पवार, हर्षवर्धन जाधवर तर अकॅडमीचे रौप्य पदक विजेते खेळाडू रिदम मुगदिया, आरव सारडा, श्रीपदम भावसार, प्रज्वल उजगरे, नंदनी राठोड हे आहेत.

### शालेय टेनिस बॉल क्रिकेटच्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या मुलींच्या संघाने रौप्य व मुलांच्या संघाने कास्य पदक पटकावले



**बीड (प्रतिनिधी):-** दि.२१,२२ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल वर्धा येथील मैदानावर शालेय टेनिस बॉल क्रिकेटच्या राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न झाल्या या शालेय स्पर्धा क्रीडा युवा सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे व वर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आल्या या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील आठ विभागातील आठ संघाने सहभाग नोंदवला होता.. या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी वर्धा व महाराष्ट्र टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनचे सचिव डॉ. मोहम्मद बाबर यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाले. या स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजी नगर विभागाचे प्रतिनिधित्व करत असताना गुरु इंग्लिश स्कूलच्या मुलींच्या संघाने रौप्य पदक पटकावले व मुलांच्या संघाने कास्य पदक पटकावले . विजयी संघा मधील गुरुकुल इंग्लिश स्कूलचे खेळाडू गौरवी परळकर, स्वराली जायभाय संस्कृती धुत, श्रुती राख, सानिका खेडकर, श्रेया कुटे, अनन्या लाहोटी, सई शिंदे,अनन्या काळवणे या खेळाडूंना गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या क्रीडा प्रशिक्षका सुरेखा वाघमारे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच मुलांच्या संघांमध्ये अरशात पठाण, सार्थक कोकरे, अन्वित सुभेदार, सक्षम वारंगुळे ,शशांक सारंगकर, रोहन शिंदे, गौरव अनमुलवार, गौरव शिंदे, सहर्ष धांडे,आर्यन गदळे या खेळाडूंना क्रीडा प्रशिक्षक कल्याण माने, रामदास गिरी, महेश गव्हाणे यांचे मार्गदर्शन लाभले. वरील गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या खेळाडूंनी वर्धा येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजी नगर विभागाचे प्रतिनिधित्व करत असताना अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत पारितोषिक पटकावले. या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर , गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या अध्यक्षा डॉ. विनिता ढाकणे, सचिव डॉ. राजेंद्र ढाकणे, कार्यकारी संचालक अखिलेश ढाकणे, प्राचार्य शितल सर्वज्ञ ,उपप्राचार्य अमोल कपूर, सारा मॅम, गणेश इंगोले, क्रीडा प्रशिक्षक , अन्य प्रशिक्षक व पालकांनी विजय मुलांचे कौतुक केले व पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या

### 'वसुंधरा सरंक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी'

**गेवराई (प्रतिनिधी):-** तालुक्यातील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर, गढी येथे भूगोल विभागाच्या वतीने जागतिक वसुंधरा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्राचार्य प्रोफे. डॉ. सदाशिव सरकटे, गृहशास्त्र विभाग प्रमुख प्रोफे. डॉ. राणी जाधव यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. राणी जाधव यांनी वसुंधरा दिन साजरा करण्यामागील भूमिका विशद केली प्राचार्य डॉ. सरकटे यांनी म्हणाले, सध्या पृथ्वीचे तापमान खूप झपाट्याने वाढत आहे. अनेक जीवसृष्टी व वनस्पती नष्ट होत आहेत. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. पृथ्वी, एकमेव जीवनदायी ग्रह, आज असंख्य पर्यावरणीय समस्यांशी झुंजत आहे– जसे की हवामान बदल, जंगलतोड, प्रदूषण, जैवविविधतेचे गढी महाविद्यालयात जागतिक वसुंधरा दिन उत्साहात नुकसान आणि संसाधनांचा अतिरेकी वापर. या वर्षीची थीम आपली शक्ती, आपला ग्रह केवळ ऊर्जा क्षेत्राबद्दल बोलत नाही तर ती हे दशीते की सामूहिक प्रयत्नांद्वारे आपण या संकटावर उपाय शोधू शकतो. हवा, पाणी आणि जमीन प्रदूषणाचा मानवी आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. जागतिक वसुंधरा दिन हा फक्त एक दिवस नाही तो एक इशारा, प्रेरणा आणि एक चळवळ आहे. हे आपल्याला आठवण करून देते की पृथ्वी ही आपली जबाबदारी आहे. जर आपण आज आपले वर्तन, धोरणे आणि जीवनशैली बदलली नाही तर भविष्यातील पिढ्यांना राहण्यासाठी सुरक्षित आणि सुंदर पृथ्वी मिळू शकणार नाही. पृथ्वी वाचवणे हे कोणत्याही एका व्यक्तीचे किंवा कोणत्याही एका राष्ट्राचे काम नाही ती आपल्या सर्वांची संयुक्त जबाबदारी आहे. प्रास्ताविक प्रा.डॉ. शिवलाल घुगे तर सूत्रसंचालन भूगोल प्रा.डॉ. कलंदर पठाण यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## राजकारणाचे गुन्हेगारीकरण लोकशाहीसाठी गंभीर समस्या

केज / प्रतिनिधीः गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले लोक राजकारणात येऊन सत्ता मिळवतात, ज्यामुळे लोकांमध्ये गुन्हेगारीची प्रतिमा निर्माण होते. काही राजकीय पक्ष निवडणुकीत जिंकण्यासाठी गुन्हेगारांची मदत घेतात. तेंव्हा राजकारणाचे गुन्हेगारीकरण ही लोकशाहीसाठी एक गंभीर समस्या आहे. यावर उपाय सर्वसामान्य लोकांना गुन्हेगारीकरणाच्या धोक्यांपासून जागरूक करणे, सुशिक्षित आणि नैतिक राजकारणी निवडणे. या समस्येवर मात करण्यासाठी कठोर कायदे, जलद न्याय, राजकीय पक्षांची जबाबदारी आणि लोकांची जागरूकता आवश्यक आहे असे प्रतिपादन मुंबई येथील राष्ट्रीय प्रवक्ते दिपक करंजीकर यांनी केले.

केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि. २२ एप्रिल रोजी जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्व.



विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून दिपक करंजीकर हे उपस्थित होते तर अध्यक्ष म्हणून पुर्णवादी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी हे उपस्थित होते. याप्रसंगी जी. बी. गदळे, उपेंद्र कोकीळ, फजिलोद्दीन काजी, डॉ. पांडुरंग तांदळे, नारायण अंधारे, प्रशांत देशपांडे, मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, प्राचार्य शंकर भैरट, वसंतराव शितोळे आदी उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय मेघशाम मंगरूळकर यांनी दिला. तिसरे पुष्प गुंफताना 'राजकारणाचे होत चाललेले गुन्हेगारीकरण कारणे आणि उपाय' या विषयावर बोलताना दिपक करंजीकर पुढे म्हणाले, राजकीय क्षेत्रातील एक्केवीस टक्के सदस्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. त्यातील काही केवळ पॉलिसीवर काम करतात. त्यामुळे समाजाचा चेहरा बेसूर होतोय. समाजामध्ये टोळ्या निर्माण होत आहेत. इथे धर्माच्या जातीच्या नावाखाली मतपेट्या तयार केल्या जात आहेत. समाज उपद्रव मूल्याकडे आकर्षित होत आहे. कायदा व सुव्यवस्था प्रचंड बिघडली आहे. काही राजकारणी चांगले असूनही याख्यानमालेत याथि प्रतिकारन परिस्थितीपुढे हतबल आहेत. शेवटी त्यांनी जलपुरुष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ. राजेंद्र सिंह यांच्या जोहड प्रकल्पाविषयी विवेचन करताना राजस्थानच्या वाळवंटात तेथील नद्या कशाप्रकारे पुनरुज्जीवीत केल्या, शिवाय जलसंवर्धन, वन्यजीवन संवर्धन अशा मोहिमेबद्दल सविस्तर माहिती सांगितली. अध्यक्षीय समारोपात डॉ. सुभाष जोशी म्हणाले, विश्वंभर कोकीळ हे खऱ्या अर्थाने केजचे मतदार राजा होते, कारण कोणत्याही राजकीय नेत्यांशी सामाजिक प्रश्नांवर ते निर्भीडपणे बोलत होते. तेंव्हा यावर्षी स्व. विश्वंभर कोकीळ जीवन विकास व्याख्यानमालेचे हे रौप्य महोत्सव वर्ष आहे. तेंव्हा अशा व्याख्यानमाला आयोजित करणे अतिशय गरजेचे आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन हनुमंत घाडगे यांनी केले तर आभार महादेव गिरी यांनी मानले.

# चराई अनुदानापोटी ७.३३ कोटी रुपये मेंढपाळांच्या थेट बँक खात्यात जमा

## पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांची माहिती

मुंबई (सरकार):पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या वतीने राज्यातील भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील ३०५४ मेंढपाळांना सन २०२४-२५ या वर्षासाठी चराई अनुदानापोटी सुमारे ७.३३ कोटी अनुदानाचे थेट हस्तांतरण (डीबीटी)द्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. मेंढ्यांच्या चराई करिता राज्यातील मेंढपाळांना अर्थ सहाय्य उपलब्ध झाल्यामुळे मेंढपाळांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत्र निर्माण झालेला आहे आणि त्यांच्या आर्थिक प्रगतीस हातभार लागला असल्याची भावना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये मेंढीपालन व्यवसाय हा पूर्णपणे स्थलांतरित पद्धतीने केला जातो. पावसाळी हंगामामध्ये मेंढपाळ त्यांच्या मूळ गावी परत आल्यानंतर पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढ्यांना चराई करिता क्षेत्र उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे चाऱ्या अभावी मेंढ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन त्यांची उत्पादकता कमी होऊन मेंढपाळ कुटुंबाचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे राज्यामधील मेंढपाळ कुटुंबाना



माहे जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढ्यांसाठी चाऱ्याची कमतरता भरून काढण्यासाठी चराई अनुदान देण्याची योजना पशुसंवर्धन विभाग व इतर मागासवर्गीय विभाग यांच्या मार्फत राबविली जात असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

राज्यामध्ये या योजनेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आलेले असून त्यामध्ये लॉटरी पद्धतीने संगणकीय प्रणालीद्वारे त्यांची निवड यादी तयार करण्यात आलेली होती. जिल्हा व तालुका निहाय धनगर व तत्सम मेंढपाळांची संख्या विचारात घेऊन जिल्हा व तालुका निहाय लक्षांक देण्यात आलेले होते. त्यामधून पात्र मेंढपाळ कुटुंबाना माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी प्रति माह ६ हजार रुपये असे एकूण २४ हजार रुपये चराई अनुदान देण्यात आले आहे. चराई अनुदान मिळाल्यामुळे मेंढपाळ कुटुंबाना त्यांच्या मेंढ्याकरिता चारा उपलब्ध झाल्याने मेंढ्यांच्या आरोग्यामध्ये सुधारणा होऊन मेंढपाळाच्या आर्थिक उत्पन्नामध्ये भर पडत आहे. या योजनेद्वारे राज्यामधील ३०५४ लाभार्थींना रु. ७.३३ कोटी अनुदान थेट लाभधारक हस्तांतरण (DBT) द्वारे लाभार्थीच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेले आहे.

# पहलगाम येथील भ्याड अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे निदर्शने



बीड (सरकार): जम्मू -काश्मिरच्या पहलगाम मधील मिनी स्वित्झर्लंड म्हणून ओळखले जाणारे बैसरण खोरे येथील निसर्गरम्य परिसरात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांवर पाक धार्जिणे अतिरेक्यांनी बेछुटपणे गोळीबार करत हल्ला केला.या भ्याड हल्लयात २८ पर्यटक मृत्युमुखी पडले असुन अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत.

या हल्ल्यानंतर देशभर पाकिस्तान विरोधात संतापाची लाट उसळली असून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२४ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे भ्याड अतिरेकी हल्लयाच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात आली.यावेळी हिंदू - मुस्लिम भाई भाई म्हणत पाकिस्तान मुर्दाबाद हल्लेखोरांना फाशी द्या पाकिस्तान विरोधी घोषणाबाजी करण्यात आली. हल्लेखोर आणि त्यामागील सुत्रधार यांना तातडीने अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी , पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना करण्यात आली. भारत सरकारने पाकिस्तान विरोधात घेतलेल्या सिंधू पाणी वाटप करार रद्द,अटारी सिमेवरील तपास नाका बंद, पाकिस्तानी नागरीकांना व्हिसा नाही, उच्चायुक्तालयातील लष्कर, नौदल आणि हवाई सल्लागार पदे रिक्त आदी निर्णयांचे स्वागत करण्यात आले.यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, अँड . गणेश वाणी,अशोकराजे वाणी ,महादेव कुदळे,शेख शफीभाऊ, समीर शेख,कैलास काटे, बालाजी निर्मळ,शंकर निर्मळ, हरिओम क्षीरसागर, सुरेश निर्मळ,कचरू रणखांब, अमोल वक्ते, भगवान मोरे,आश्रुबा गिरे, संतोष भोसले, नाना वाणी, जनार्दन वाणी, राजेंद्र वायभट आदी ग्रामस्थ सहभागी होते.

## जाधव परिवाराला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाची मदत

गेवराई (सरकार): जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचेकर्मचारी स्वर्गीय सुरेश जाधव यांच्या परिवाराला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाच्या वतीने आर्थिक मदतीचे वाटप शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते करण्यात आले.

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांना विविध आजारात मदत केली जाते तसेच सेवेत निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या परिवारालाही आर्थिक मदतीचे वाटप करण्यात येते. जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रामपुरी येथील पर्यवेक्षक जाधव सुरेश भिमराव यांचे अल्पशा आजाराने निधन झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबाला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळ गेवराई कडून आर्थिक मदतीसाठी एक लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते आर्थिक मदतीचा धनादेश जाधव परिवाराला देण्यात आला. यावेळी साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाचे अध्यक्ष भागवतराव राऊत, मंडळाचे व्यवस्थापक श्रीराम शेळके, रामपूरी विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक तौर माजी मुख्याध्यापक बाबुराव टकले, माजी क्रिडा शिक्षक भवार यांच्यासह कार्मचारी उपस्थित होते.

# आदिवासी महिलांना वाईट हेतूने छेडछाड करुन शिवीगाळ

बीड (सरकार):शिरुर तालुक्यातील वारणी गावातील आदिवासी महिलांना गावातीलच काही लोकांकडून सतत वाईट हेतूने छेडछाड करुन शिवीगाळ करण्यात आल्याची घटना घडली आहे या बाबत या महिलांनी सुरुवातीला शिरुर कासार पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता पोलीसांनी तक्रार घेतली नाही उलट महिलांना हाकलून दिले म्हणून या महिलांकडून पोलीस अधिक्षक कार्यालय येथे लेखी तक्रार देण्यात आली आहे.

**शिरुर पोलीस तक्रार घेत नसल्याने पोलीस अधिक्षकांकडे लेखी तक्रार**

याबाबत माहिती अशी की, शिरुर तालुक्यातील वारणी गावातील आदिवासी भिल्ल समाजाचे लोक राहतात. मोलमजुरी व ऊसतोडणी करुन हे लोक उदरनिर्वाह करतात काही दिवसांपासुन तक्रार देणार्या महिलांचे पती चुकीच्या गुन्ह्यात जेलमध्ये आहेत या गोष्टीचा गैरफायदा घेवून या गावातील काही गुंड प्रवृत्तीचे लोक यांनी वेळोवेळी वाईट नजर ठेवुन, लज्जास्पद शब्द वापरुन महिलांची किंमत विचारणे सारखे प्रकार केले आहेत जर या महिलांनी विरोध केला तर त्यांच्या राहत्या घरावर दगड, काठयाने मारणे, दरवाज्यावर कुर्हाडीने मारणे असे प्रकार घडतात याची तक्रार त्यांनी पोलीस स्टेशन शिरुर (का.) येथे दिली असता अगदी पोलीस स्टेशन समोर महिलांच्या हाताला धरुन व पुरुष लोकांचा जमाव जमा करुन ओढाओढ केलेली आहे याचे व्हिडीओ देखील पुरावा म्हणून महिलांकडे आहेत.

याबाबत शिरुर पोलीस स्टेशन येथे जावुन तक्रार देण्याचा प्रयत्न केलेला असुन तेथील पोलीसांनी तक्रार घेण्याऐवजी तक्रारदार महिलांनाच बेईज्जत करुन तेथुन हाकलुन देतात त्यामुळे या महिलांनी आज रोजी पोलीस अधिक्षक बीड यांच्याकडे लेखी तक्रार दिली आहे सदरील महिलांना खुप दिवसांपासून त्रास चालु आहे त्यामुळे आरोपींवर कठोर कारवाई करावी व न्याय न दिल्यास दिनांक २८/०४/२०२५ वार सोमवार रोजी पिडीत आदिवासी महिला बेमुदत उपोषणास बसणार असल्याचे पत्रकाद्वारे कळविले आहे.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या श्रद्धांजली

बीड (सरकार): जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्लयामध्ये २८ पेक्षा जास्त निष्पाप पर्यटक नागरिकांना आपला जीव गमावला हा दहशतवादी हल्ला अतिशय निंदनीय तसेच हृदय पिळवटून टाकणार आहे.

अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्लयाचा दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी मातृभूमी प्रतिष्ठानच्या कार्यालयात आयोजित बैठकीत प्रतिष्ठाचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी निषेध व्यक्त करून मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने हल्लयातील मृत्युमुखी निष्पाप पर्यटक देश बांधवांना श्रद्धांजली वाहिली तसेच या हल्लयात जखमी झालेल्यांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली.

यावेळी डॉ. संजय तांदळे , सुदाम कोळेकर, पांडुरंग जायभाये, प्रा.बाळासाहेब नागरगोजे ,बाजीराव ढाकणे, बाळासाहेब खाडे, प्रा. अशोक नागरगोजे, बाबासाहेब जायभाये ,लक्ष्मण चाटे आदींची उपस्थिती होती.

# ग्रामीण रस्त्यांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणार-अमरसिंह पंडित

## ईटकुर जोड रस्त्यावरील १५८ लक्ष रुपयांच्या पुल बांधकामाचा शुभारंभ

गेवराई (सरकार): तालुक्यातील रामा ५२ ते ईटकुर - शिंपेगाव - लोळदगाव रस्त्यावरील साखळी क्र. १ / ९१० वरील १५८.१३ लक्ष रुपयांच्या पुल बांधकामाचा शुभारंभ नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज व जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते करण्यात आला. ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरु असून दळणवळणाची साधने निर्माण झाल्यास या भागाचा विकास होण्यास मदत होईल असे प्रतिपादन अमरसिंह पंडित यांनी केले. विकासाची दृष्टी अमरसिंह पंडित यांच्याकडे असल्यामुळे तेच या भागाचा विकास करू शकतील असे प्रतिपादन यावेळी ह.भ.प. शिवाजी महाराज यांनी केले. व्यासपीठावर शिंपेगाव येथील दत्त संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. हनुमान महाराज गिरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. ईटकुर येथील अखंड हरीनाम सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमाला माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी भेट देऊन उपस्थितांशी संवाद साधला.



गेवराई विधानसभा मतदार संघात अतिशय दर्जेदार विकासकामे सुरु आहेत. आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध केला जात आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत राष्ट्रीय महामार्ग ५२ ते ईटकुर - शिंपेगाव - लोळदगाव रस्त्यावरील साखळी क्र. १ / ९१० वर १५८.१३ लक्ष रुपये किंमतीच्या पुल बांधकामाचा शुभारंभ बुधवार, दि.२३ एप्रिल रोजी करण्यात आला. यावेळी नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज, जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, दत्त संस्थान, शिंपेगावचे मठाधिपती ह.भ.प. हनुमान महाराज गिरी, ह.भ.प. धुराजी बाबा, ह.भ.प. करांडे महाराज, मादळमोहीचे सरपंच राजेंद्र वारंगे, आहेरचिंचोलीचे सरपंच विकास रकटे, माजी पं.स.सदस्य जयसिंग जाधव, दत्ता भोजगुडे, माजी सरपंच अरुण वाघमारे, उपअभियंता पोपटराव जोगदंड, नितीन विर यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. ईटकुर येथे सुरु असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी भेट देऊन ग्रामस्थांशी सुसंवाद केला, यावेळी त्यांनी ह.भ.प. शिवाजी महाराज यांचे आशिर्वाद घेतले.

यावेळी सरपंच पांडुरंग शिंदे, सरपंच विष्णू पिसाळ, अतुल नलावडे, सुभाष एरंडे, सखाराम जाधव, सरपंच बंडू परदेशी, वैजिनाथ मासाळ, त्रिंबक ढेंगळे, वसंत ढेंगळे, चेअरमन चंद्रकांत जाहेर, माणिक मासाळ, श्रीराम मासाळ, सतिष देवकते, भागवत ढेंगळे, सुनिल ढेंगळे, मच्छिंद्र वडमारे, सतिष ढेंगळे, सिध्देश्वर जाहेर, गणेश ढेंगळे, गणेश जाहेर, अमोल लोखंडे, शहादेव ढेंगळे, अशोक ढेंगळे, पांडुरंग सिराम, संतोष सिराम, हनुमान ढेंगळे, बंडू जाहेर, विनायक मासाळ, बाबासाहेब मासाळ, मधुकर ढेंगळे, माणिकराव मासाळ यांच्यासह ईटकुर, शिंपेगाव, लोळदगाव, शहाजानपूर आदी भागातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदित्य शिक्षण संस्थेत राबवली जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहीम

बीड (सरकार): अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग व सामाजिक आर्थिक मागास प्रवर्ग एस .ई. बी. सी. (मराठा) या मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांचे वतीने महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीचे औचित्य साधून 'समता पंधरवडा' या विशेष मोहिमेचे आयोजन बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत करण्यात आले होते.



'समता पंधरवडा' कालावधी १ ते १४ एप्रिल दरम्यान राबवण्यात आला. यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळणे साठी विशेष मोहिम राबवण्यात आली. आदित्य शिक्षण संस्थेत आयोजित कार्यक्रमाला संगणक विभाग प्रमुख प्रा. सलीम शेख, कार्यालयीन अधीक्षक जात पडताळणी कार्यालय बीडचे गणेश शेजाळ, प्रकल्प अधिकारी बार्टी ज्ञानोबा मात्रे, समतादूत बार्टीचे ज्ञानोबा गुजर, सहाय्यक जातपडताळणी कार्यालय बीड च्या साधना मस्के यांची उपस्थिती होती. यावेळी गणेश शेजाळ यांनी महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांसाठी चालू असलेल्या योजना जसे की स्वाधार योजना,पंडीत दीनदयाल स्वयम् योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, आदित्य पॉलिटेक्निक बीड चे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. लक्ष्मण तांबे यांनी मानली. यावेळी प्रा. सलीम शेख,प्रा. प्रशांत दुधाळ, प्रा. अजय दुधाळ, प्रा. पी. आर. अ,प्रा. अक्षय राऊत, प्रा. शिवानी जाधव, प्रा. मिन्हाज शेख यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शुभम पवार, प्रा. प्रियंका नागरगोजे यांनी परिश्रम घेतले.

## न.प.बीडच्या वाहन चालकाने स्वत: खर्च करुन जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील अनाथांना दिले मोफत पाणी

बीड (सरकार): मागील काही दिवसांपासून बीड शहरात तांत्रिक अडचणीमुळे भिषण पाणी टंचाई जाणवत असून अशाही परिस्थितीत नगर




पालिकेच्या पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवरील चालक विनायक तमन्ना गायकवाड यांनी जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील वृद्ध, विकलांग, निराधार लाभार्थी पाण्यासाठी वणवण भटकत असतानाचे दृश्य पाहीले व त्यांनी या गरजुना स्व खर्चाने आठ दिवस पुरेल इतके मुबलक पाणी उपलब्ध करून दिले.

या त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून या छोट्या पण आवश्यक सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून हे त्यांचे सामाजिक कार्य बीड शहरातील विविध दानशूर व्यक्ती, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रातील संघटनांनी त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन आपल्याबरोबरच इतरांना जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील गरजु लाभार्थ्यांसाठी आपल्या परिवारातील सदस्या समवेत वाढदिवस असो की इतर कार्यक्रम अशा अनेक कार्याच्या माध्यमातून येथील वृद्ध, विकलांग, निराधार लाभार्थी यांना एकवेळसाठी नाममात्र एक हजार पाचशे रुपये भरुन अन्नदान, वस्त्रदानासाठी पुढे यावे तसेच तन- मन- धनाने सहकार्य करावे असे आवाहन चालक विनायक तमन्ना गायकवाड, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे, संचालक अभिजित वैद्य, यश वंजारे, मदतनीस छाया सरोदे यांनी केले आहे.

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व खास करुन बीड जिल्ह्यातील जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे विकास राजाभाऊ रंगदळ रा. माळापुरी ता.जि.बीड यांनी दिलेल्या माहिती, अधिकार व दाखवलेल्या कागदपत्रावरुन खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देतोत की, वासुदेव माधवराव तळेकर रा. रंगार गल्ली पेठ बीड ता.जि.बीड यांचे मालकी व ताब्यातील र.डी.जि.प.बीड सब डि.व.पं.स.ता.बीड पैकी बीड नगर परिषद हद्दीतील नवा मोंढा वार्ड-३ गट- १४ मालमत्ता क्र. जुना ३-१४-१७८ व नवा ३-१४-१८१ मधील पुर्ण जागा ६०.३२ चौ.मी आहे तसेच बांधकाम पत्रे निवासी ३७.२० चौ.मी. आहे.

ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस : २० फुट रुंदीचा रस्ता , पश्चिमेस: गोस्वामी यांचे घर

दक्षिणेस : बाळु घुमरे यांचे घर

उत्तरेस : रत्नपारखी यांचे घर

वरील चतु:सिमेअंतर्गत येणारी जमीन आमचे पक्षकार यांनी वासुदेव माधवराव तळेकर रा. रंगार गल्ली पेठ बीड ता. जि. बीड यांचे कडून खरेदी करुन घेणार आहेत. या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर जमीनीच्या खरेदीखताबाबत कसल्याही प्रकारचा व्यवहार जसे की, ईसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, आम मुखत्यारपत्र, दिवाणी व फौजदारी वाद, कर्ज बोजा, वाटणी, हिबानामा व इतर कोणत्याही स्वरुपाचे कोणतेही व्यवहार अथवा वाद असल्यास १५ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासोबत खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. १५ दिवसात या संदर्भात काही आक्षेप नसल्यास आम्ही या घराचे रितसर खरेदीखत करुन ती कायमस्वरुपी विकत घेतील. त्या नंतर कोणतीही तक्रार केली तरी ती मान्य होणार नाही. सबब हे जाहीर प्रगटन.

बीड

दिनांक: २३/०४/२०२५

मार्फत :-
**अॅड. सुरेंद्र डी. हांगे**
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड

जाहीर प्रगटन देणार
स्वाक्षरित/
**विकास राजाभाऊ रंगदळ**
**मो.नं. ९२०९३००२५३**

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)